# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# एमसीव्हीसी (एचएससी व्होकेशनल) शाखेचे प्रवेश जुन्या पद्धतीने : डॉ. कळंत्रे

**पाटण**, दि. २२ : राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. या वर्षापासून शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या इयत्ता अकरावीचे संपूर्ण राज्यातील सर्व मान्यताप्राप्त कंनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान, वाणिज्य, कला शाखेचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. एमसीव्हीसी (एचएससी व्होकेशनल) शाखेचे प्रवेश हे जुन्या पद्धतीने होणार असल्याची माहिती बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात म्हटले आहे, राज्य शिक्षण मंडळाच्या चार शाखा असून यामध्ये विज्ञान, कला, वाणिज्य व एमसीव्हीसी शाखांचा समावेश आहे. राज्यातील सहा गटात अभ्यास ३० विविध शाखांचे अभ्यासक्रम शिकवले जातात. आमच्या महाविद्यालयात कृषी गटातील हॉर्टिकल्चर, अभियांत्रिकी गटातील इलेक्ट्रिक टेक्नॉलॉजी, कॉमर्स गटातील बँकिंग फायनान्शियल सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स हे अभ्यासक्रम शिकवले जातात. हे अभ्याक्रम रोजगाराभिमुख असून बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी प्रवेश दिला जातो. हा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी. ए, बी.कॉम, बी. एस्सी., बी. सी. ए., बी.कॉम. आय. टी., हॉटेल मॅनेजमेंटसाठी प्रवेश मिळतो. वरिष्ठ विभागाकडील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी, एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., बी.कॉम., आय. टी. या वर्गांचे प्रवेश देखील सुरू झाले असल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे यांनी दिली.